# शब्दांची सोबत

शब्दांच्या संगे माझी जन्मगाठ
शब्दांचा रहाट ओढीतसे,
ज्ञानाच्या विहिरीत शब्दांचीच मोट
अक्षरांचा पाट जोडीतसे — १

शब्दांच्या कासेशी माझा रोजगार
माझा पोटमार सापडला
जेथे शब्द माझ्या आत्म्याला हुंकार
देहाची पुकार फोडीतसे — २

शब्दांनीच आज रंगविल्या ओळी
फकिराची झोळी अबुळिया
दोहोंचे अद्वैत एकूणि कापकी
शब्दांचे तांडव नाचतसे — ३

विधीच्या गर्भात शब्दांचा सोयरा
तोच सखा खरा माझ्यासाठी.
जीवेभावे आज शब्दांचा मी दास
इहलोकी प्रवास शब्दांसंगे — ४

माझ्या जीवलगांनो ऐकां विनवणी
नाही मागणे कुणि शब्दाविण
जर कां भेटली मजसी अंतयात्रा
भरवावी जत्रा शब्दांचीच. — ५

सहदेव मखामले

१०।३।८१